# मेळघाट आनंद मेळावा २०१६

दिवाळी जवळ आली की मला वेध लागतात मेळघाटातील आनंद मेळाव्याचे. शोभाताई व मी आमच्या दोघींच्या तयारी गणपती नंतरच सुरु झालेली असते, तिला आणखी वेग येतो. दिवाळीची घरातील गडबड आणि त्याच बरोबर शिबिरासाठी स्वयंसेवकांची निश्चिती, सामान पाठवणे, निधीसाठी लोकांशी संपर्क करणे अशी सगळी धांदल उडते. यावेळी सगळ्या धांदलीत भर पडली डेंग्यू आणि चिकनगुनिया आजारांची. काही स्वयंसेवक त्यामुळे गळले. काही जुने तर काही आयत्यावेळचे असे अखेरीस ८ जण आम्ही पुण्यातून शिबीर घेण्यासाठी ४ नोव्हेंबर शुक्रवारी रात्रीच्या गाडीने निघालो.

कामाला गाडीतच सुरुवात झाली आणि कार्डशीट चांदणीच्या आकारात कापून त्याला रंगीत रिबिनी लावून २०० बिल्ले (badges) आम्ही तयार केले. एकेका गटाला एका रंगाच्या रिबीनीचे बिल्ले दिल्यामुळे गट ओळखणे आणि मुलांना पटकन गोळा करणे हे सगळ्यांनाच सोपे झाले.

शिबिराच्या आदल्या दिवशी सर्व स्वयंसेवक आणि गावामित्र/मैत्रिणी एकत्र बसून शिबिरातील सर्व कृती समजून घेतल्या आणि प्रत्येकाने एकेक नमुना करून पण पाहिला. चिलाटी व सुमिता अशा दोन जागी शिबीर होणार असल्यामुळे सर्व शैक्षणिक साधने, अन्य साधने, स्वयंपाकाची भांडीकुंडी व शिधा अशा सर्व गोष्टी विभागणी करून दुस-या ठिकाणी पाठवल्या. रोज सकाळी सुमिताच्या स्वयंसेवकांना मोटरसायकलने चिलाटी ते सुमिता असा प्रवास करावा लागे कारण जीप मुलांना आणण्यासाठी लागत.

सकाळी ९ वाजल्यापासून मुले जमायला सुरुवात होई. दूरच्या गावातून जीपने येणारी जरा उशीरा पोहोचत. कवायत, प्रार्थना, ओंकार घेऊन मग आधी नाश्ता करायचा. पोहे, डाळ तांदुळाची खिचडी, हुलग्यांची उसळ, उपमा यापैकी काहीतरी असे. मग लगेच गटात बसून शिबीर सुरु होई. यंदा दोन्ही ठिकाणची मिळून १६० मुले-मुली होती शिबिरात.

यावेळी दररोज चित्रवाचन व गोष्ट वाचून दाखवणे या कृती आम्ही नव्याने घेतल्या. मोठे चित्र गटासमोर ठेवायचे, त्यात काय काय दिसते आहे हे मुले सांगायची आणि स्वयंसेवक मग त्यावर आधारित आणखी माहिती द्यायचे. जरा मोठ्या वयाच्या मुलांच्या गटात हे जास्त परिणामकारक झाले. पुण्यातील अक्षरनंदन च्या एका पालकांनी खास मोठ्या कागदावर चित्रे काढून दिली होती. गोष्ट वाचनासाठी सोप्या आणि चित्रे मोठी व मजकूर कमी अशी पुस्तके आम्ही निवडली होती. काही इंग्रजी पुस्तकाना मराठी subtitles लिहून देण्याचे काम पुण्यातील काही मित्रमैत्रिणीनी केले होते. आधी गोष्ट कशाबद्दल आहे हे सांगून मग वाचून दाखवायची असे ठरले होते. आम्हाला वाटले होते तितकी मजा मुलांना यात आली नाही. कदाचित त्यांना त्या गोष्टीतल्या कथेशी जोडून घेता आले नाही किंवा ती जोडणी करण्यात आम्ही स्वयंसेवक कमी पडलो. पुढच्या वेळी थोडी अधिक तयारी करून हे पुन्हा करून पहायचे आहे.

‘आला आला फेरीवाला’, ‘लंबी दाढीवाले बाबा’, ‘माझ्या बोटात जादू आहे’, ‘गाडी आली धक्का मारा रे’’ ही यावेळची नवीन शिकवलेली ‘हीट’ गाणी. शिवाय गतसालची ‘चिमणा चिमणीचं लगीन’, ‘अट्टू आणि गट्टू फिरायला चालले’ ही खास मुलांच्या फर्माईशी साठी परत घेतली. ‘निले आकाशमे’, ‘म्हातारीची शेती होती’, ‘रेलमे छना नना’ ही सदाहरित प्रकारातली. मुलांना गाणी म्हणायला फार आवडते. त्यामुळे कंटाळा घालवायला आम्ही खूप गाणी घेतो अभिनयासकट. अपर्णाने घेतलेल्या ‘माझ्या बोटात जादू आहे’ गाण्यावर मुलेच काय आम्ही स्वयंसेवक पण फिदा होतो.

फेरीवाल्याच्या गाण्यामध्ये फेरीवाला, भाजीवाली आणि फळवाला आहे. मग मुलांना त्यामधील चित्रे काढायला सांगितली. खेळणी आणि फळे फार सुंदर काढली काहीनी. भाज्या काढणे थोडे अवघड वाटत होते ते काम विद्याने सहजतेने केले. यातल्या काही चित्रांची आम्ही शेवटच्या दिवशी पपेटस् बनवली.

ओरिगामी मध्ये टोपी, डोंगा (होडी), कुत्रा, मासा, पंखा, घर अशा विविध वस्तू आम्ही शिकवल्या. त्यावर तिथल्या मुलांनी आम्हाला साप, चोकोनी भांडे आणि कॅमेरा शिकवला. ‘शिकवता शिकवता शिकावे….’ रंगीबेरंगी कागदांमध्ये मुले रमून गेली होती.

कागदी पुंगळ्यापासून बनवलेला ट्रे म्हणजे रद्दी कागदांचा अतिशय कलात्मक वापर. पहिल्याच दिवशी एकेका गटासाठी असा एकेक ट्रे बनवला त्यामुळे पुढील सर्व गटकामाचे साहित्य ठेवायला सोपे झाले. दोन्ही हातांचा वापर करून बारीक घडी घालून गुंडाळत घट्ट पुंगळी/ सुरनळी बनवायची. प्रत्येकाने एक - दोन बनवल्या आणि मग पुठ्ठ्यावर त्या चिकटवल्या. त्याला जरा सजावट केली की झाला तयार झकास ट्रे. हर्षद दादाने घट्ट गुंडाळी येण्यासाठी मुलांना वेगवेगळ्या युक्त्या शिकवल्या.

यावेळी एका मित्राने प्राण्यांची मोठ्या आकाराची ‘स्टेनसिल’ दिली होती. ‘स्टेनसिल’ वापरून चित्र काढणे ही सर्वात लोकप्रिय कृती ठरली. ‘स्टेनसिल’ एका हाताने घट्ट धरायचे, पेन्सिलीने चित्र काढायचे, मग बाह्यरेखा स्केचपेनाने रंगवायची आणि मग चित्र खडूने रंगवायचे… वा! हे लिहितानाही मला ते सगळे वातावरण डोळ्यापुढे येते आहे. एकेका गटाला चारच ‘स्टेनसिल’ आम्ही देऊ शकलो. पण मुले एक झाले ही दुसरे घ्यायची, एकमेकाला मदत करायची, वस्तूंची अदलाबद्दल… अगदी कौतुक वाटावे इतक्या शहाणेपणाने करत होती.

या शिबिरासाठी भरपूर कार्डशीट एका मित्राने दिली होती. ती आम्ही भेटकार्ड च्या आकारात कापून नेली होती. रंगीत कागदाची फुले, गवत, पाने, फुलपाखरे असे कापलेले आकार चिकटवून मुलांनी भेटकार्ड तयार केली. हर्षाने उरलेल्या तुकड्यांना मुलांकडून रंगवून घेतल्या आणि साखळ्या बनवल्या. आर्य आणि सर्जनशील कृती तर प्राधान्याने होत्याच शिबिरात. त्याशिवाय दोन अभ्यासखेळ पण शोभाताईनी मुद्दाम तयार करून दिले होते.

(१) चिठ्ठी वाचून कृती करणे – काही सोप्या क्रिया (उदा. – सशाची उडी मार, टाळी वाजव, अंघोळ कर इ.) एकेका चिठ्ठीवर लिहिल्या. पिशवीत/ टोपलीत/ डब्यात सर्व चिठ्ठ्या ठेवायच्या. एकेकाने

एक चिठ्ठी उचलायची, वाचायची आणि तशी कृती करायची. बाकीच्यांनी ती ओळखायची असा मूळ खेळ. मुलांच्या वयानुसार आणि आकलनानुसार थोडा थोडा बदल करून घ्यावा लागला. जिथे मुलाना वाचता येत नव्हते तिथे स्वयंसेवक मुलाला ती वाचून समजावून सांगायचे. मग सर्वांनीच ती कृती करायची. काही स्वयंसेवक स्वत: करायचे कृती आणि ओळखायला लावायचे. जास्त मजा येण्याकरता चिठ्ठ्यांचा डबा फिरवून 'passing the parcel' सारखे पण काहींनी घेतले. पुढे हा खेळ गावामित्र घेऊ शकतील. थोडी कल्पकता दाखवली तर अभ्यास करण्यासाठी पण याचा उपयोग होईल.

(२) आरोग्य सापशिडी – नेहेमीचे सापशिडीचे पट नेले होते. उमाताईनी झटपट जाड कागदाचे मोठे फासे बनवले या खेळाकरता. सुरुवातीला सापशिडी नुसतीच खेळायला दिली. तिथे थोड्याच मुलांना सापशिडी माहीत होती. मोठा फासा हातात घेउन हलवून टाकणे ही अत्यंत आवडीची गोष्ट होती मुलांसाठी. नेहेमीचा खेळ थोडा वेळा झाल्यावर मग वळलो आरोग्यखेळाकडे. आरोग्यासाठी चांगल्या आणि वाईट सवयी एकेका चिठ्ठीवर लिहिल्या होत्या. (उदा. रोज अंघोळ करणे, जेवण्याच्या आधी हात धुणे, वाढलेली नखे कापली नाहीत इ.). फासा टाकला की एक चिठ्ठी उचलायची. त्यात असलेली आरोग्यसवय चांगली असेल तर पुढे जायचे नाहीतर नाही. यातून चांगल्या वाईट सवयी मुलांना कळतील. सापशिडीचा खेळ अभ्यासासाठी खूप प्रकाराने वापरता येईल. म्हणजे गणिताच्या चिठ्ठ्या बनवायच्या (२+३ = ?, ९–२ = ? इ.). बरोबर उत्तर दिले तर फाशाचे दान घ्यायचे नाहीतर नाही. भाषेसाठी पण वापरता येईल उदा. शब्द/ वाक्य लिहायचे चिठ्ठीत. बरोबर वाचता आले तर फाशाचे दान मिळेल नाहीतर नाही.

हे अभ्यासखेळ परिणामकारक होण्यासाठी मुलांची आणि घेणा-यांची पण थोडी अधिक तयारी व्हायला हवी असे वाटले. नियमितपणे खेळले तर मुलांना मजा येईल आणि अभ्यास पण होईल. गावमित्रांच्या पुढच्या बैठकीत आम्ही याचा सराव घ्यायचे ठरवले आहे.

शेवटच्या दिवशी खास बालाग्रहास्तव 'चिमणा चिमणीचं लगीन' हा पपेट शो पुन्हा घेतला. तसेच सर्व मुलांना सहभागी करून घेत 'फेरीवाला' गाण्याचे सादरीकरण केले. तिथे उपलब्ध असलेल्या साधनांमधून भाज्यांची टोपली, फळवाल्याची पेटी, खेळण्यांची पेटी तयार केली. प्रत्येक मुलाला त्याने काढलेले चित्र हातात दिले. मग काय? झाले झकास सादरीकरण !

रोज संध्याकाळी थोडे खेळ घेऊन मुलांना खाऊ दिला की घरी जायची मुले आणि आम्ही आमच्या ठिकाणी. लगेच आजचा आढावा आणि दुस-या दिवाशीची तयारी. थंडीने गारठलो की शेकोटीपाशी बसून गप्पा. चार दिवस कसे संपले कळले नाही.

स्वयंसेवक आणखी असते तर नक्कीच मदत झाली असती पण जे होते ते कुठेही कमी पडले नाहीत. मानस आणि आर्य हे आमचे लहान स्वयंसेवक पण सर्व कृती अगदी व्यवस्थित घेत होते. सुमिता गावातील बबलू हा मुलगा अमरावतीच्या सैनिकी शाळेत शिकतो. तो सुट्टीमध्ये गावी येतो आणि आपल्या शिबिरामध्ये मदतीला स्वत:हून येतो. त्याची बहीण लता पण मदत करते. या दोघांचे विशेष कौतुक वाटते.

११ नोव्हेंबर शुक्रवार दुपारचे परतीचे रेल्वे तिकीट 'confirm' न झाल्यामुळे आम्हाला थोडा मोकळा वेळ अचानक मिळाला. त्यामुळे आम्ही चिखलदरा इथे जावून मग रात्रीच्या बसने पुण्याला निघालो ते शिबिराच्या आठवणी मनात घोळवतच.

या शिबिरासाठी प्रत्यक्ष जरी आम्ही ८ स्वयंसेवक गेलो असलो तरी अनेकांचे हात त्या मागे होते. आर्थिक मदत देणारे, साहित्य, धान्य देणारे, शिबिराच्या कृतींसाठी पूर्वतयारी करणारे असे खूप मित्र मैत्रिणी आहेत. तसेच स्थानिक कार्यकर्ते व गावमित्र हे पण आमच्या बरोबर होते. शिबिर व्यवस्थित पार पाडण्याचे श्रेय वरील सगळ्यांचे आहे. सगळ्यांना मनापासून धन्यवाद !

यावेळचा शिबिरासाठीचा गट

शिबीर कार्यक्रम आखणी : मी व शोभाताई

स्वयंसेवक: अक्षरनंदन शाळेतील इयत्ता नववीचे विद्यार्थी (आर्य हरताळकर, मानस टेकाळे), हर्षा हरताळकर (अक्षरनंदन पालक), अपर्णा भागवत, विद्या ढोरे, उमा घोळे, हर्षद पेंडसे आणि मी. मेळघाटातील 'मैत्री' चे कार्यकर्ते – रामेश्वर फड, अशोक धिकार, रमेश मावस्कर, दिलीप, कुंजीलाल, बाबुलाल, मोतीलाल, काळू बेठेकर, दिलीप

गावमित्र व मैत्रिणी – रत्ना (सिमोरी), कविता (चिलाटी), सोमजी (कुही), निलेश (रुईपठार), सोनाजी (सुमिता), गेंदालाल (सलिता), परशराम (भांडूम), किशोर (मारिता), लक्ष्मी (कारंजखेडा)
सहाय्यक: राहुल, लीनता वैद्य, तुषार, कुलकर्णी काका, 'मैत्री' विश्वस्त, इतर 'मैत्री' सहकारी आणि सर्व देणगीदार व हितचिंतक

तरी कृपया ज्यांना या व अशा उपक्रमांमध्ये सहभागी व्हायचे असेल त्यांनी "मैत्री" या संस्थेशी कार्यालयीन वेळात (सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते ५.००) ०२०-२५४५०८८२ क्रमांकावर संपर्क साधावा.

**अश्विनी धर्माधिकारी**